# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/आस्था/3171/2024-25** **दि.18/02/2025**

**<u>आदेश</u>**

बुधवार दि.19 फेब्रुवारी 2025 रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास सकाळी 08.15 वाजता पुष्पहार अर्पण करून सकाळी 08.30 वाजता घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा ते घोडबंदर किल्ला येथे महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व नागरीक यांच्या उपस्थितीत “जय शिवाजी जय भारत” पदयात्रा आयोजित करण्यात आलेले आहे. तद्नंतर एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास व मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्या कार्यालयासमोर प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम मा.आयुक्त महोदय यांच्या शुभहस्ते आयोजित केला आहे व मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे.

तरी सदर कार्यक्रम व पदयात्रेच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा येथे बुधवार दि.19 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 07.45 वाजता न चुकता उपस्थित राहणेबाबत व कार्यक्रम/पदयात्रेत सहभाग नोंदविणेबाबत मा.आयुक्त महोदय यांनी निर्देश दिलेले आहेत.

तरी कार्यक्रम/पदयात्रा संपेपर्यंत सर्व अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य असून अनुपस्थित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(सचिन बांगर)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व अधिकारी/कर्मचारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner